दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

भरदिवसा दोन ठिकाणी घरफोड्या

अहिल्यानगर : सावेडी उपनगरात श्रीरामचौक परिसरात आणि अन्य ठिकाणी चोरट्यांनी १२ नोव्हेंबर रोजी भरदिवसा अनेक घरे फोडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज चोरून नेला आहे.सावेडी उपनगरातील श्रीरामचौक परिसरात बायजाबाई सोसायटी, ज्ञानेश्वरनगर येथे राहणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक बाळासाहेब पवार यांचे घरही चोरट्यांनी सोडले नाही. पवार यांचे कुटुंबीय बाहेरगावी गेलेले होते. ते एकटेच घरी होते. ते ही दुपारी १२ च्या सुमारास घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते.

जिल्हा बँक अध्यक्ष निवडणूकीच्या वेळी चोरट्यांनी साधला डाव

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष - उपाध्यक्ष पदाची निवडणुक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी पार पडली. या दिवशी बँकेच्या आवारात आणि निवडीनंतर झालेल्या मिरवणुकीतील गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी अनेकांची पाकिटे मारल्याची घटना समोर आली आहे, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र फिर्यादी दाखल झाल्या आहेत. यातील एका चोरट्याला रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

वैयक्तिक कर्ज मिळवणे आता अधिक सोपे

मुंबई : भारतातील अग्रगण्य आर्थिक प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या पैसाबाजारने, १८ कर्जदाते भागीदारांसह आपला झटपट वैयक्तिक कर्ज कार्यक्रम अधिक मजबूत केला आहे. या कार्यक्रमांतर्गत, ग्राहक डिजिटल प्रक्रियेद्वारे ₹७ लाखांपर्यंतचे वैयक्तिक कर्ज घेऊ शकतात. बँकेची मंजुरी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर, ग्राहकांना एक ते दोन तासांत कर्जाची रक्कम मिळू शकते. या कार्यक्रमात सहा प्रमुख बँका देखील सहभागी झाल्या आहेत. पैसाबझारचा उद्देश डिजिटल अर्ज आणि जलद प्रक्रियेद्वारे वैयक्तिक कर्ज प्रक्रिया सोपी आणि सुलभ करणे आहे. बँका, एनबीएफसी आणि फिनटेक कंपन्यांचा समावेश असलेला हा कार्यक्रम, ग्राहकांना त्यांच्या गरजा आणि कर्ज घेण्याच्या क्षमतेनुसार विविध पर्याय उपलब्ध करून देतो. एकाच प्लॅटफॉर्मवर वेगवेगळ्या कर्जदात्यांच्या ऑफर्स उपलब्ध करून दिल्यामुळे, ग्राहक त्यांची अचूक तुलना करून योग्य पर्याय निवडू शकतात.

टोयोटा इनोव्हा क्रिस्टा लिमो

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटरने (टीकेएम) फ्लीट आणि व्यावसायिक मोबिलिटी क्षेत्रातील ग्राहकांसाठी 'इनोव्हा क्रिस्टा लिमो एडिशन' ही विशेष आवृत्ती सादर केली आहे. जीएक्स-एसएलएफ या ग्रेडमध्येच उपलब्ध असलेल्या या लिमिटेड एडिशनच्या माध्यमातून टोयोटाच्या व्यावसायिक मोबिलिटी ग्राहकांना स्वतंत्र ओळख देण्याचा कंपनीचा उद्देश आहे. विश्वासार्हता, आरामदायी प्रवास, सुरक्षितता, लक्झरी आणि दमदार कामगिरी ही इनोव्हा क्रिस्टाची वैशिष्ट्ये या नव्या आवृत्तीतही कायम ठेवण्यात आली आहेत.

सीपीडब्ल्यूडी कडून 198.31 कोटी रुपयांचे कंत्राट

मुंबई - हायवे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला सेंट्रल पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट कडून १९८.३१ कोटी रुपयांचे नागरी बांधकाम (सिव्हिल कन्स्ट्रक्शन) कंत्राट मिळाले आहे. या नवीन कंत्राटाच्या समावेशामुळे, ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत हायवे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची एकूण ऑर्डर बुक १,७७६.१९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. या ताज्या ऑर्डरमुळे कंपनीच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या पोर्टफोलिओला बळकटी मिळाली असून, सरकारी क्षेत्रातील बांधकामांमध्ये कंपनीचा सहभाग अधिक विस्तारला आहे.या घडामोडीवर भाष्य करताना, हायवे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे होल-टाइम डायरेक्टर आणि मुख्य वित्तीय अधिकारीअनूप अग्रवाल म्हणाले, "पायाभूत सुविधा आणि नागरी बांधकाम क्षेत्रात आमचा विस्तार सुरू असताना, मिळालेली ही ऑर्डर कंपनीसाठी अत्यंत उत्साहवर्धक आहे. सीपीडब्ल्यूडी साठी अशा मोठ्या प्रमाणावरील प्रकल्प हाती घेतल्यामुळे, महत्त्वाच्या सरकारी पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील आमचा अनुभव अधिक समृद्ध होईल."त्यांनी पुढे सांगितले की, वाढती ऑर्डर बुक कंपनीला मिळालेल्या व्यावसायिक संधी दर्शवते. कंपनी आपली अंमलबजावणी क्षमता अधिक बळकट करण्यावर आणि भविष्यात अधिक मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प मिळवण्यावर भर देत आहे.

एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाची दमदार वाटचाल

नवी दिल्ली - भारतातील आघाडीचा कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड, एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने आज आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने शेअर बाजारात लिस्ट झाल्यानंतर, मागील वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक वाढ मिळवली आहे. तसेच, सलग दुसऱ्या तिमाहीत दुहेरी अंकी वाढ नोंदवली आहे.



राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 मध्ये महाराष्ट्राचा डंका! विदित गुजराती, दिव्या देशमुख यांना अर्जुन पुरस्कार

नवी दिल्ली: महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू विदित संतोष गुजराती आणि दिव्या जितेंद्र देशमुख यांना अर्जुन पुरस्कार, नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चौहान यांना द्रोणाचार्य पुरस्कार, तर पुण्यातील आर्मी पॅरालिम्पिक नोड या संस्थेला राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बुद्धिबळातील आंतरराष्ट्रीय यश, नेमबाजीतील उत्कृष्ट प्रशिक्षण आणि दिव्यांग सैनिकांच्या क्रीडा पुनर्वसनातील उल्लेखनीय योगदानाच्या जोरावर महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 मध्ये आपली ठळक छाप उमटवली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आज आयोजित विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.



नाशिकचा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू विदित संतोष गुजराती याने बुद्धिबळ क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बुडापेस्ट येथे झालेल्या 45 व्या फिडे बुद्धिबळ ऑलिंपियाड 2024 मध्ये सुवर्णपदक, हांगझाऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक त्याने मिळवले आहे तसेच आयल ऑफ मॅन येथे झालेल्या फिडे ग्रँड स्विस 2023 स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याची कामगिरी त्याने केली आहे. त्याच्या या आंतरराष्ट्रीय यशाची दखल घेत त्याला अर्जुन पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

नागपूरची युवा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू दिव्या जितेंद्र देशमुख हिनेही आपल्या उल्लेखनीय कामगिरीने महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे. 45व्या फिडे बुद्धिबळ ऑलिंपियाड 2024 मध्ये दोन सुवर्णपदके, अलमाटी येथे झालेल्या 2023 च्या आशियाई खंडीय महिला बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक आणि 2022 मध्ये दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत कांस्यपदक मिळविण्याची कामगिरी तिने केली आहे. तिच्या या यशस्वी क्रीडा प्रवासाचा गौरव अर्जुन पुरस्काराने करण्यात आला.

महाराष्ट्रातील प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांना नेमबाजी क्षेत्रातील उत्कृष्ट प्रशिक्षण कार्य आणि खेळाडूंच्या कौशल्य विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी करण्यासाठी मिळालेल्या प्रोत्साहनाची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली आहे. दिव्यांग सैनिकांच्या क्रीडा पुनर्वसनात पुण्याच्या आर्मी पॅरालिम्पिक नोडची महत्त्वपूर्ण कामगिरी पुण्यातील आर्मी पॅरालिम्पिक नोड या संस्थेला जी देशसेवेदरम्यान दिव्यांगत्व आलेल्या सैनिकांचे पुनर्वसन करून त्यांना पॅरा क्रीडा प्रकारांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देते त्यांना राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.

'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजने'ला वेग, 25 मतदारसंघांत सह- अध्यक्षांची नियुक्ती!



मुंबई: महाराष्ट्र शासनाकडून शेतकऱ्यांच्या हितासाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने'ची अंमलबजावणी अधिक प्रभावी व वेगवान करण्यासाठी राज्यातील 25 विधानसभा मतदारसंघांतील क्षेत्रस्तरीय समित्यांवर 'सह-अध्यक्ष' (Co-Chairperson) म्हणून नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष निर्देशानंतर महसूल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (GR) जारी केला आहे.

यापूर्वी 15 जुलै 2026 रोजी राज्यातील तब्बल 91 विधानसभा मतदारसंघांमध्ये सह-अध्यक्षांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर आता उर्वरित 25 मतदारसंघांतील समितीच्या कामकाजाला गती देण्यासाठी नवीन सह-अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या नवनियुक्त प्रतिनिधींचा समित्यांमध्ये तात्काळ समावेश करून तातडीने कामकाज सुरू करण्याचे सक्त आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा गावपातळीवर शेत आणि पाणंद रस्त्यांअभावी शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी किंवा शेतमाल बाजारात नेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी ही विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. स्थानिक पातळीवर सह-अध्यक्षांच्या नेमणुकीमुळे शेतकऱ्यांच्या अडीअडचणी थेट समितीपर्यंत पोहोचणे सोपे होणार असून, रखडलेली रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल, असा विश्वास महसूलमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

रोज नवा 'फेक नॅरेटिव्ह' रचायचा, हाच गांधी यांचा 'फुल-टाइम' उद्योग

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

मुंबई: राहुल गांधी यांना सध्या 'मोदी फोबिया'ने इतके पछाडले आहे, त्यांना उठता-बसता, जागता-झोपता फक्त नरेंद्र मोदीजीच दिसतात. स्वतःची बुडती नाव वाचवण्यासाठी आणि प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी 'फोन टॅपिंग'सारखे निराधार, कपोलकल्पित आणि बालिश आरोप करुन राहुल गांधी स्वतःचेच हसे करुन घेत आहेत, अशी खरमरीत टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधी यांच्यावर केली आहे.



खिशात पुरावे असल्याच्या पोकळ बाता मारायच्या, हवेत तीर सोडायचे आणि रोज नवा 'फेक नॅरेटिव्ह' रचायचा, हाच गांधी यांचा 'फुल-टाइम' उद्योग झालाय, असा टोलाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला. राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर फोन टॅपिंग केल्याचा आरोप केला. त्यावर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी गांधी यांच्यावर एक्स पोस्टमधून टीका केली.

उथळ पाण्याला खळखळाट फार... राहुल गांधी यांना सध्या 'मोदी फोबिया'ने इतके पछाडले आहे. त्यांना उठता-बसता, जागता-झोपता फक्त नरेंद्र मोदीजीच दिसतात. सत्य हेच आहे की, जोपर्यंत ते पंतप्रधानांचे नाव घेत नाहीत, तोपर्यंत त्यांची बातमीही होत नाही आणि माध्यमांच्या चर्चेतही ते टिकू शकत नाहीत. स्वतःची बुडती नाव वाचवण्यासाठी आणि प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी आता ते 'फोन टॅपिंग'सारखे निराधार, कपोलकल्पित आणि बालिश आरोप करत आहेत, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

ना कोणता ठोस मुद्दा, ना विकासाचे व्हिजन, ना दाव्यांच्या पुष्ट्यर्थ एकही पुरावा! फक्त खिशात पुरावे असल्याच्या पोकळ बाता मारायच्या, हवेत तीर सोडायचे आणि रोज नवा 'फेक नॅरेटिव्ह' रचायचा, हाच त्यांचा आता 'फुल-टाइम' उद्योग झाला आहे. एकीकडे देश पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली प्रगतीचे नवे शिखर गाठत असताना, दुसरीकडे विरोधी पक्षनेते मात्र अशा हास्यास्पद विधानांनी स्वतःचेच हसे करून घेत आहेत. 'उथळ पाण्याला खळखळाट फार' ही म्हण आज त्यांच्या बाबतीत तंतोतंत खरी ठरते, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; भरधाव ट्रकने 15 वाहनांना उडवले, सुदैवाने जीवित हानी नाही

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर दुसरबीड टोल प्लाजा परिसराजवळ भीषण अपघाताची घटना घडली आहे. समृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच आहे. मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेज क्रमांक 332 वर वाहतूक कोंडीत उभ्या असलेल्या वाहनांच्या ताफ्यात नागपूरकडून मुंबईकडे जाणारा एक भरधाव ट्रक वेगाने घुसला मागून येणारी 12-15 भरधाव वाहने एकमेकांवर आदळली. या साखळी अपघातात तब्बल 12 ते 15 वाहने एकमेकांवर आदळल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की काही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला आहे. प्रवासी वाहनांतील 20 ते 22 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, सकाळी समृद्धी महामार्गाच्या मुंबई कॉरिडॉरवर एक टँकर पलटी झाला होता. क्रेनच्या मदतीने हा पलटी झालेला टँकर बाजूला काढण्याचे काम सुरू होते. वाहतूक पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी थांबवली होती. त्यामुळे घटनास्थळी सुमारे 40 ते 50 वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. याचवेळी नागपूरहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या एका ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा ट्रक थेट समोर उभ्या असलेल्या वाहनांवर जाऊन



आदळला. सकाळच्या अपघातामुळे आधीच आधीच खोळंबल्या वाहतुकीला या अपघाताचा फटका बसला. रस्ता रिकामा होईपर्यंत थांबलेल्या प्रवाशांना ट्रकने गाठले. वाहनांची रंग असताना चालकाला ट्रक का थांबवता आला नाही? हा महत्वाचा प्रश्न समोर येत आहे. चालकाने मद्यप्राशन केले होते का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पहिल्या धडकेने वाहन पुढे ढकलली गेली आणि त्या मागे डहाकेची मालिका सुरूच झाली. सुदैवाने ह्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या अपघातामुळे महामार्गावर ट्रकच्या रांगा लागल्या असून, घटनेची माहिती मिळताच मदतकार्य आणि अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्याचे काम सुरू झाले आहे. अपघातात नेमके किती जण जखमी झाले किंवा जीवितहानी झाली आहे का, याबाबत अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.



अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात विलिनीकरणाबाबत माझ्यासमोरच चर्चा

मंत्री छगन भुजबळ यांचा दावा; दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रीकरणासाठी तुटक चर्चांऐवजी सामूहिक संवादाची अपेक्षा

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चेला पुन्हा वेग आला असताना, यापूर्वीही या विषयावर चर्चा झाल्याचा दावा ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे. 'अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात विलिनीकरणाबाबत माझ्याच उपस्थितीत ४० ते ४५ मिनिटे चर्चा झाली होती. दोन्ही गटांनी एकत्र यावे, अशी भूमिका मी त्यावेळी मांडली होती,' असा गौप्यस्फोट भुजबळ यांनी केला. मात्र, त्या चर्चेनंतर पुढे काहीच घडले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

भुजबळ यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर ते आजारी असताना जयंत पाटील त्यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी आपण सर्वांनी एकत्र यायला हवे, असे मत त्यांनी पाटील यांच्याकडे व्यक्त केले. त्यावर पाटील यांनी, आपण सध्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा (एनडीए) भाग आहात, त्यामुळे आपल्या मित्रपक्षांना हे मान्य होईल का, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर राष्ट्रवादीचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत अजित पवार याबाबत निर्णय घेतील आणि पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांच्याशीही चर्चा होईल, असे आपण सांगितल्याचे भुजबळ यांनी नमूद केले.

भुजबळ म्हणाले, 'दोन्ही बाजूंनी सांघिक पद्धतीने चर्चा झाली पाहिजे. आमच्यातील एखादा नेता दुसऱ्याला भेटतो आणि चर्चा करतो, असे प्रकार सुरू आहेत. क्रिकेटचा खेळ सुरू असल्यासारखी परिस्थिती आहे. तुटक तुटक चर्चा नको, सर्वांनी एकत्रितपणे बोलले पाहिजे. आम्हीही अनेक गोष्टी प्रसारमाध्यमांतूनच ऐकतो,' असे ते म्हणाले. 'माझ्या आयुष्यात दोन मार्गदर्शक भेटले. एक बाळासाहेब ठाकरे आणि दुसरे शरद पवार. बाळासाहेब आता नाहीत, तर शरद पवार दुसऱ्या पक्षात आहेत.

भारताची अमेरिकेला निर्यात 11 टक्क्यांनी वाढली; सहा महिन्यांत 50.80 अ ज डॉलरची निर्यात

नवी दिल्ली : भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारासाठी (BTA) वाटाघाटी सुरू असतानाच अमेरिकेला होणाऱ्या भारतीय निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष 2027 च्या एप्रिल ते सप्टेंबर या 6 महिन्यांच्या कालावधीत भारताची अमेरिकेला होणारी निर्यात 11 टक्क्यांनी वाढून 50.80 अब्ज अमेरिकी डॉलरवर पोहोचली आहे. मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ही निर्यात 45.73 अब्ज डॉलर होती.

अमेरिकेला होणारी एकूण निर्यात 13 टक्क्यांनी वाढली

वाणिज्य विभागाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार, भारताची अमेरिकेला होणारी एकूण निर्यात मागील वर्षीच्या 59.30 अब्ज डॉलरवरून 13 टक्क्यांनी वाढून 66.82 अब्ज डॉलर झाली आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसेच बाजारपेठेतील प्रवेश सुलभ करण्यासाठी प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारावर चर्चा सुरू आहे. व्यापारातील अडथळे दूर करणे आणि दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य वाढवणे हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

व्यापार कराराच्या वाटाघाटींना वेग

अमेरिकेच्या शिष्टमंडळाने 2 आणि 3 नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीत वाणिज्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी सीमाशुल्क प्रक्रिया आणि व्यापार सुलभतेसंदर्भात चर्चा झाली. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी यापूर्वी प्रस्तावित करारावरील बहुतांश चर्चा पूर्ण झाल्याचे सांगितले होते. दोन्ही देश सध्या उर्वरित तपशिलांना अंतिम स्वरूप देण्याच्या प्रक्रियेत आहेत. या व्यापार करारासाठीच्या वाटाघाटी फेब्रुवारी 2025 मध्ये सुरू झाल्या होत्या.



ब्राझील, मेक्सिको आणि कॅनडातील निर्यातीतही वाढ

अमेरिकेबरोबरच इतर प्रमुख बाजारपेठांमध्येही भारताच्या निर्यातीत वाढ नोंदवण्यात आली आहे.

ब्राझील : निर्यात 14 टक्क्यांनी वाढून 4.33 अब्ज डॉलरवर.

मेक्सिको : निर्यात 26 टक्क्यांनी वाढून 3.45 अब्ज डॉलरवर.

कॅनडा : निर्यात 18 टक्क्यांनी वाढून 2.67 अब्ज डॉलरवर.

भारत आणि कॅनडा यांच्यात सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या (CEPA) वाटाघाटी सुरू असताना कॅनडाला होणाऱ्या निर्यातीत वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

युरोपमधील निर्यातीत 8 टक्क्यांची वाढ

आर्थिक वर्ष 2027 च्या एप्रिल-सप्टेंबर या कालावधीत युरोपला होणारी भारताची निर्यात 8 टक्क्यांनी वाढून 51.04 अब्ज डॉलरवर पोहोचली. यामध्ये ब्रिटनला होणारी निर्यात 7 टक्क्यांनी वाढून 7.32 अब्ज डॉलर, तर जर्मनीला होणारी निर्यात 12 टक्क्यांनी वाढून 6.34 अब्ज डॉलर झाली. भारत आणि युरोपियन युनियनने जानेवारी 2026 मध्ये मुक्त व्यापार करारासाठीच्या वाटाघाटी पूर्ण केल्या आहेत. आता या करारावर स्वाक्षरी आणि त्याच्या अंमलबजावणीच्या दिशेने दोन्ही बाजूंकडून प्रयत्न सुरू आहेत. तसेच, भारत-ब्रिटन सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार (CETA) 15 जुलै 2026 रोजी लागू झाला. त्यामुळे ब्रिटनला होणाऱ्या भारताच्या जवळपास 99 टक्के निर्यातीवर शून्य शुल्क लागू झाले आहे.

आफ्रिका आणि आशियातील बाजारपेठांमध्येही विस्तार

भारताच्या निर्यात बाजारपेठांचा विस्तार होत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. आर्थिक वर्ष 2027 च्या एप्रिल-सप्टेंबरमध्ये आफ्रिकेला होणारी निर्यात 44 टक्क्यांनी वाढून 31.42 अब्ज डॉलरवर पोहोचली. तर आशियाला होणारी निर्यात 21 टक्क्यांनी वाढून 103.84 अब्ज डॉलर झाली. अमेरिका, युरोप, आशिया आणि आफ्रिका या प्रमुख बाजारपेठांमध्ये झालेली निर्यातवाढ भारताचा जागतिक व्यापारातील वाढता सहभाग आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील विस्तार अधोरेखित करते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क माफी

राज्यात उद्भवलेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचा फटका केवळ शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाच बसला नाही, तर उच्च शिक्षेचे स्वप्न पाहणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या कुटुंबांनाही आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण समयी विद्यार्थ्यांना धीर देणारा आणि त्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये म्हणून राज्य सरकारने घेतलेला परीक्षा शुल्क माफीचा निर्णय अत्यंत स्तुत्य आणि दिलासादायक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संबंधित पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र परीक्षेसाठी राज्यातील तब्बल २ लाख ९६ हजार ११४ विद्यार्थ्यांना या शुल्क सवलतीचा थेट लाभ मिळणार असून, शिक्षण क्षेत्रातील हा एक अत्यंत संवेदनशील निर्णय ठरला आहे. या योजनेचे विशेष कौतुक करावे लागेल ते म्हणजे, ज्या २५ हजार ७४ विद्यार्थ्यांनी यापूर्वीच आपले परीक्षा शुल्क भरले होते, त्यांना दिवाळीच्या काळातच १ कोटी ८८ लाख ३३ हजार रुपयांचा परतावा देण्याची प्रक्रिया विद्यापीठाने तातडीने सुरू केली. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निर्देशानंतर उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने या निर्णयाची अतिशय प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी केली आहे. २७ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा असोत किंवा २१ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या व्यावसायिक व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा असोत, एकाही पात्र विद्यार्थ्याला पैशांअभावी शिक्षणापासून किंवा परीक्षेपासून वंचित राहावे लागणार नाही, याची पूर्ण दक्षता प्रशासनाने घेतली आहे. संकटाच्या काळात बळीराजाच्या पाठीशी उभे राहतानाच तरुण पिढीच्या भविष्याची काळजी वाहणे ही एका लोककल्याणकारी सरकारची खरी ओळख असते. दुष्काळाच्या आव्हानांवर मात करत विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण अविरत चालू ठेवावे, यासाठी शासनाने घेतलेला हा निर्णय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा एक भक्कम आधारस्तंभ ठरला आहे.

ग्रामीण विकासाला नवी दिशा : शाश्वत रोजगार आणि जलसंधारणातून समृद्ध गावांचा संकल्प

विकसित भारत - रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेतून गावाचा विकास हा गावाच्या सहभागातूनच शक्य आहे. ग्रामसभा, ग्रामपंचायत, प्रशासन आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे या योजनेचे नियोजन व अंमलबजावणी केली, तर रोजगाराची हमी देतानाच पाणीसमृद्ध, शेतीसमृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण गावांची निर्मिती करता येईल. हाच विकसित भारताच्या संकल्पनेकडे जाणारा ग्रामीण विकासाचा खरा मार्ग ठरू शकतो.

ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेती आणि पूरक व्यवसायांशी निगडित मालमत्ता निर्माण करण्यावर भर दिला जातो. फळबाग लागवड, वृक्षलागवड आणि शेताच्या बांधावर वृक्षसंवर्धन करणे, चारा लागवड, जनावरांसाठी गोठे बांधणे, शेळीपालनासाठी निवारा, कुक्कुटपालन शेड, मत्स्यव्यवसायासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, गांडूळ खत प्रकल्प, नाडेप कंपोस्ट आणि सेंद्रिय खत निर्मिती, शेतमाल साठवणुकीसाठी मान्य संरचना, कांदा चाळ आणि कृषीपूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीबरोबर दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन आणि इतर पूरक व्यवसाय करता येतील. त्यामुळे कुटुंबाचे उत्पन्न एकाच पिकावर अवलंबून राहणार नाही. परिणामी या योजनेतून स्थानिक रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

यंदा अल निनोच्या प्रभावामुळे ग्रामीण भागाला दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, मृदाक्षरण आणि पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशा संकटांपासून गावांचे संरक्षण करण्यासाठी या विभागाकडून सदरील कामे घेता येतात. दुष्काळ प्रतिबंधक जलसंधारण, मृद व जलसंधारण, वृक्षलागवड आणि वनसंवर्धन, पूरप्रतिबंधक संरचनेतून नाल्यांमधील पाण्याचा प्रवाह नियंत्रित करता येणे शक्य आहे.

ही योजना राबविण्यासाठी निधीचा विचार करणे महत्त्वाचे असून, योजना राबविताना महाराष्ट्रात केंद्र व राज्य शासनाचा निधी सहभाग महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रासारख्या सर्वसाधारण राज्यांसाठी केंद्र शासनाचा हिस्सा 60 टक्के, तर राज्य शासनाचा हिस्सा 40 टक्के असा आहे. ईशान्येकडील आणि हिमालयीन राज्यांसाठी वेगळे म्हणजेच 90/10 असे प्रमाण लागू आहे. व्हीबीजीरामजी योजनेमध्ये 375 प्रकारची विविध कामे समाविष्ठ केली आहेत. त्याशिवाय केंद्र शासनाने याव्यतिरिक्त अधिकची कामे समाविष्ठ करण्यासाठी सूचविण्याचे आवाहन केले आहे. या 375 कामांचे स्वरुप हे काही वैयक्तिक, सार्वजनिक व अभिसरणाची कामे आहेत. यामध्ये जलतारा, वैयक्तिक शोषखड्डे, विहीर पुनर्भरण, चारा लागवड घेता येणार आहे. त्याशिवाय रेन वॉटर हार्वेस्टिंग, तीन प्रकारचे शेततळ्यांचा समावेश आहे.

यामध्ये अनुदान आणि निधी मंजुरी, वैयक्तिक लाभाच्या कामांसाठी काही बाबी महत्त्वाच्या असतात. त्यामध्ये लाभार्थ्याची योजनेच्या नियमांनुसार पात्रता, संबंधित जमिनीचे क्षेत्र आणि मालकी हक्क, कामाचे तांत्रिक स्वरूप आणि मोजमाप, शासनाने निश्चित केलेले आर्थिक निकष, ग्रामसभेची मान्यता आणि प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक अधिकाऱ्यांनी मंजूर केलेले अंदाजपत्रक, प्रत्यक्ष कामाची प्रगती आणि मोजमाप पुस्तिकेतील नोंदी, म्हणून केवळ छायाचित्रातील रकमेच्या आधारे अनुदानाचा दावा करता येणार नाही. अंतिम देय रक्कम अधिकृत नियमांनुसारच निश्चित होईल.

या योजनेत ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्याला महत्त्व आहे. गावातील कोणत्या भागात पाणीटंचाई आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कोणत्या रस्त्यांची दुरवस्था आहे आणि कोणत्या भागात जलसंधारणाची कामे होणे आवश्यक आहे, याचा शास्त्रीय अभ्यास करून कामे निश्चित केली पाहिजेत. यासाठी ग्रामसभा, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि संबंधित विभाग यांच्यात समन्वय आवश्यक आहे.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्यानंतर भविष्यात ग्रामीण भागाला दूरगामी लाभ होणार असून, ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत अनेक सकारात्मक बदल घडतील. यामध्ये प्रामुख्याने भूजल पातळीत सुधारणा होईल. जलसंधारण, विहीर पुनर्भरण, शेततळी आणि शोषखड्डे यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरविता येईल. परिणामी विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होईल. त्यामुळे कृषि उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यास पिकांचे नुकसान कमी होऊ शकते. दुबार पीक घेण्याची क्षमता वाढू शकते. फळबाग आणि भाजीपाला लागवडीला प्रोत्साहन मिळू शकते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा जीवनमानाचा दर्जा ऊंचावेल. शेतीबरोबर दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय आणि इतर पूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण होऊ शकतात.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील हातांना स्थानिक पातळीवर काम मिळेल. परिणामी बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाल्याने ग्रामीण मजुरांना रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करण्याची गरज राहणार नाही. व्ही बी जी रामजी योजनेमुळे दुष्काळाचा सामना करण्याची क्षमता येथील नागरिकांमध्ये वाढेल. विशेषतः मराठवाड्यासारख्या पर्जन्यमानातील अनिश्चितता असलेल्या भागात जलसंधारणाची कामे महत्त्वपूर्ण ठरतील. पावसाचे पाणी साठविणे आणि जमिनीत मुरविणे यामुळे भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

व्ही बीजी रामजी या योजनेच्या यशस्वी किंवा प्रभावी अंमलबजावणीमुळे येथील पशुधनाची जपवणूक होईल. शेतकऱ्यांचे गोठे ओस पडणार नाहीत. नुकतेच दिवाळीत त्या गोठ्यांचे मोठ्या भक्तिभावाने शेतकऱ्यांकडून पूजन करण्यात आले आहे. पशुधनाचे संवर्धन होईल. चारा लागवड, गोठे आणि पशुपालनाशी संबंधित कामांमुळे जनावरांचे आरोग्य सुधारण्यास आणि दुग्धोत्पादन वाढविण्यास मदत होईल. जिल्ह्यात

गावांचा पायाभूत विकास, रस्ते, सार्वजनिक सुविधा, पाणीपुरवठा आणि स्वच्छतेशी संबंधित कामांमुळे गावातील जीवनमान उंचावेल, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वयं-सहायता बचत गट, ग्रामीण उपजीविका आणि पूरक व्यवसायांना जोडून महिलांसाठी रोजगार व उत्पन्नाच्या संधी वाढविता येतील, पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड, मृदसंधारण, जलसंधारण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल.

मराठवाडा आणि परभणी जिल्ह्यासाठी योजनेचे विशेष महत्त्व

मराठवाड्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. अनियमित पाऊस, पावसातील खंड, भूजल पातळीतील घट आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत व्ही.बी.-जी. रामजी योजना परभणी जिल्ह्यासाठी ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे साधन ठरू शकते. जिल्ह्यातील गावांच्या भौगोलिक परिस्थितीनुसार पुढील कामांना प्राधान्य देता येईल. पाणीटंचाई असलेल्या गावांमध्ये जलतारा, शोषखड्डे आणि विहीर पुनर्भरण, पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या भागांमध्ये नाला खोलीकरण आणि बंधारे, कमी सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांसाठी पात्रतेनुसार शेततळी आणि विहिरी, पशुधन अधिक असलेल्या गावांमध्ये चारा लागवड आणि गोठे, डोंगराळ व उताराच्या भागात मृद व जलसंधारणाची कामे, गावांतर्गत रस्ते आणि सार्वजनिक सुविधांचा विकास, शेतीपूरक व्यवसायांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, विशेषतः प्रत्येक गावाने आपला जलसंधारण आराखडा तयार करून उपलब्ध पाण्याचे स्रोत, पावसाचे प्रमाण, जमिनीचा उतार, भूजल पातळी आणि शेतीची गरज यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अशा नियोजनामुळे एकाच गावात वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली कामे करण्याऐवजी संपूर्ण पाणलोट क्षेत्राचा एकात्मिक विकास साधता येईल.

योजना प्रभावीपणे राबवून यशस्वी करण्यासाठी ग्रामसभेत नागरिकांना योजनेची संपूर्ण माहिती देणे आवश्यक असून, त्यामध्ये पात्र लाभार्थ्यांची पारदर्शक पद्धतीने निवड करणे, पाणलोट क्षेत्राचा शास्त्रीय अभ्यास करून जलसंधारणाची कामे निश्चित करणे, वैयक्तिक आणि सार्वजनिक कामांमध्ये योग्य समन्वय राखणे, मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणेच कामांची अंमलबजावणी करणे, कामांच्या गुणवत्तेवर नियमित देखरेख ठेवणे, मजुरीचे पैसे वेळेत अदा करणे, कामांच्या पूर्णत्वानंतर त्यांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करणे, ग्रामस्थांचा सहभाग आणि सामाजिक लेखापरीक्षण प्रभावी करणे, इतर कृषी, जलसंधारण, पशुसंवर्धन आणि ग्रामीण विकास योजनांशी अभिसरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे, केवळ निधी खर्च करण्यासाठी कामे न घेता गावाच्या पुढील १० ते १५ वर्षांच्या गरजा लक्षात घेऊन कामांचे नियोजन करणे आवश्यक आहे.

विकसित भारत - रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजना ही रोजगारातून समृद्धीकडे, जलसंधारणातून स्वयंपूर्ण गावांकडे घेऊन जाणारी आहे. ही योजना केवळ ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणारी योजना म्हणून मर्यादित न राहता ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकते. रोजगाराची हमी, जलसंधारण, शेतीला सिंचन, पशुधन संवर्धन, पूरक व्यवसाय आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास या सर्व बाबींचा एकत्रित विचार या योजनेत करण्यात आला आहे.

आज ग्रामीण भागासमोर सर्वांत मोठे आव्हान म्हणजे पाण्याची उपलब्धता, शेतीची अनिश्चितता आणि रोजगाराच्या मर्यादित संधी. या तिन्ही समस्यांवर एकाच वेळी काम करण्याची संधी या योजनेतून उपलब्ध होऊ शकते. मात्र, योजनेचे खरे यश हे केवळ मंजूर निधी किंवा पूर्ण झालेल्या कामांच्या संख्येवर मोजता येणार नाही. त्या कामांमुळे गावातील वाढणारा पाणीसाठा, सिंचनाचा लाभ मिळालेले शेतकरी, शाश्वत रोजगार मिळालेली कुटुंब संख्या आणि गावाच्या अर्थव्यवस्थेत सकारात्मक झालेला बदल, यावर या योजनेचे यश अवलंबून असेल.

प्रभाकर बारहाते
माहिती अधिकारी,
***जिल्हा माहिती कार्यालय,**
परभणी*

अपीलीय प्राधिकरण कार्यालयासाठी भाडेतत्त्वावर इमारत देण्यासाठी इच्छुकांनी 20 नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.13, (विमाका): अनुसचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या निर्णयाविरूध्द अपील करण्यासाठी ' अपीलीय प्राधिकरण ' कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाच्या वापरासाठी भाडेतत्त्वावर इमारत घेण्यात येणार आहे. यासाठी इच्छूक इमारत मालकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले असून 20 नोव्हेंबर,2026 पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या सहआयुक्त तथा उपाध्यक्ष प्रिती बोंद्रे(केळकर) यांनी केले आहे. संबंधित इमारतीचे क्षेत्रफळ अंदाजे ३ हजार चौरस फुटांपेक्षा कमी नसावे. तसेच इमारतीमध्ये पार्किंगसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध असणे, पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था असणे आवश्यक आहे. इमारत छत्रपती संभाजीनगर शहराच्या मध्यवर्ती भागात असावी, जेणेकरून अभ्यागतांना ये-जा करणे सोयीचे होईल. इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या दरानुसार अदा करण्यात येणार आहे.

तरी इच्छूक इमारत मालकांनी आपल्या इमारतीचा तपशील व आवश्यक कागदपत्रांसह ११ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर-१ या कार्यालयात प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

म्हैसूरमध्ये पंतप्रधान मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या 'एलईडी डोम' तारांगणाचे उद्घाटन!

म्हैसूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM narendra Modi) यांनी शुक्रवारी (१३ नोव्हेंबर) म्हैसूर विद्यापीठ परिसरात देशातील पहिल्या अत्याधुनिक 'एलईडी डोम' तारांगणाचे (COSMOS-Mysuru Planetarium) अत्यंत दिमाखात उद्घाटन केले. कर्नाटकच्या वैज्ञानिक, तांत्रिक आणि शैक्षणिक प्रगतीत या प्रकल्पामुळे एक नवा सुवर्णअध्याय जोडला गेला आहे. या बहुप्रतिक्षित आणि महत्त्वाच्या उद्घाटन सोहळ्याला देशाच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह अनेक दिग्गज मान्यवर आणि अधिकारीवर्ग प्रामुख्याने उपस्थित होते.

भारतीय ताराभौतिकी संस्था (IIA) द्वारे 'कॉसमॉस-म्हैसूर' या वास्तूची निर्मिती करण्यात आली असून, हे तारांगण खगोलशास्त्र क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षणाचे एक प्रमुख जागतिक दर्जाचे केंद्र म्हणून विकसित केले गेले आहे. ऐतिहासिक चामुंडी टेकड्यांच्या रमणीय पायथ्याशी उभे राहिलेले हे केंद्र विद्यार्थी, तरुण संशोधक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये विज्ञानाबद्दलची आवड व उत्सुकता वाढवण्यास तसेच खगोलशास्त्र सामान्यांपर्यंत पोहोचवण्यास मोलाची भूमिका बजावणार आहे.

या तारांगणाची रचना अत्यंत आधुनिक आणि थक्क करणारी आहे. या सुविधेमध्ये १५ मीटरचा कललेला (tilted) डोम असून, त्यात सुमारे ६,१५० विशेष पॅनेल्सचा समावेश आहे. या संपूर्ण संरचनेत तब्बल ४.२ कोटी वैयक्तिक एलईडी (LED) लाइट्सचा वापर करण्यात आला आहे. पारंपारिक किंवा जुन्या पद्धतीच्या तारांगणांमध्ये पडद्यावर खगोलशास्त्रीय चित्रे किंवा ग्रह-तारे दाखवण्यासाठी बाह्य प्रोजेक्टरचा वापर केला जातो; मात्र कॉसमॉसच्या या अत्याधुनिक एलईडी पॅनेल्सना रिअल-टाइममध्ये (थेट नियंत्रणाद्वारे) नियंत्रित करता येते. यामुळे पाहणाऱ्यांना अत्यंत मनमोहक, स्पष्ट आणि प्रत्यक्षात अंतराळात फिरत असल्याचा (इमर्सिव्ह) भास होणारा अनुभव मिळतो. या तंत्रज्ञानामुळे खगोलशास्त्र शिक्षणाला एक नवी आणि आधुनिक दिशा मिळाली आहे. या केंद्रातील 'स्काय थिएटर'मध्ये खगोलशास्त्रावरील उच्च दर्जाचे व्यावसायिक कार्यक्रम दाखवले जाणार आहेत. याशिवाय, म्हैसूरचा समृद्ध इतिहास आणि खगोलशास्त्र यांच्यातील ऐतिहासिक संबंध उलगडून दाखवणारा एक विशेष लघुपटही येथे पाहायला मिळणार आहे. प्रेक्षकांची सोय लक्षात घेऊन हे सर्व शो कन्नड, इंग्रजी आणि हिंदी या तिन्ही प्रमुख भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

शिक्षणाची पंढरी असलेल्या म्हैसूरमध्ये आणखी एक मानाचा तुरा - निर्मला सीतारामन

उद्घाटन सोहळ्याला संबोधित करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हैसूरच्या प्राचीन शिक्षण, संस्कृती आणि ज्ञानाच्या समृद्ध परंपरांचा विशेष गौरव केला. 'कॉसमॉस'च्या रूपाने या परंपरेत आणखी एक बहुमूल्य पुष्प जोडले गेले असल्याचे त्यांनी सांगितले. विश्वाचे रहस्य समजून घेण्यासाठी समर्पित असलेल्या या नवीन केंद्राचे त्यांनी यावेळी जोरदार स्वागत केले. अर्थमंत्र्यांनी कर्नाटकचे राज्यपाल, मुख्यमंत्री, राज्य सरकार आणि म्हैसूर जिल्हा प्रशासनाचे या प्रकल्पाच्या उभारणीसाठी मिळालेल्या उत्तम सहकार्याबद्दल मनापासून आभार मानले. तसेच या सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहिलेल्या म्हैसूरमधील शाळांच्या उत्साही विद्यार्थी आणि शिक्षकांचे त्यांनी विशेष स्वागत केले.

देशभरातील एक कोटी कुटुंबांना दैनंदिन पंचोपचार पूजा शिकविण्याचा विश्व हिंदू परिषदेचा संकल्प

महाराष्ट्र–गोव्यात दोन लाखांहून अधिक कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य; दोन तासांचे प्रशिक्षण सर्व जाती-समुदायांसाठी विनामूल्य

श्रद्धेय अशोकजी सिंहल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त देशभरातील *एक कोटी हिंदू कुटुंबांना वर्षभरात दैनंदिन पंचोपचार पूजा सोप्या पद्धतीने शिकविण्याचे लक्ष्य* विश्व हिंदू परिषदेने निश्चित केले आहे. या राष्ट्रीय अभियानांतर्गत *महाराष्ट्र आणि गोव्यात दोन लाखांहून अधिक कुटुंबांना* प्रशिक्षण देण्याची योजना आखण्यात आली आहे. प्रत्येक जिल्हा, तालुका, प्रखंड आणि नगरात, तसेच गावागावांत आणि वस्त्यांमध्ये प्रशिक्षण पोहोचविण्यासाठी परिषदेच्या मंदिर, अर्चक-पुरोहित संपर्क आयामाचे कार्यकर्ते तयारीला लागले आहेत.

परिषदेच्या केंद्रीय सूचनापत्रानुसार, कुटुंबांच्या प्रशिक्षणासाठी *विजयादशमी २०२६ ते विजयादशमी २०२७, म्हणजे २० ऑक्टोबर २०२६ ते ९ ऑक्टोबर २०२७, असा राष्ट्रीय अभियानाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रत्येक प्रांताने किमान ५० हजार कुटुंबांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवावे, अशी सूचना आहे. महाराष्ट्र–गोव्यात स्थानिक पूर्वतयारी पूर्ण झालेल्या केंद्रांवर **जानेवारी २०२७ पासून प्रत्यक्ष वर्ग टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे* नियोजन आहे.

संपूर्ण कुटुंबासाठी दोन तासांचे विनामूल्य प्रशिक्षण

गंध, पुष्प, धूप, दीप आणि नैवेद्य या पाच उपचारांनी देवपूजा करण्याच्या पद्धतीला पंचोपचार पूजा म्हणतात. पूजेसाठी लागणारे साहित्य, विधीचा क्रम, मंत्रोच्चार आणि उपलब्ध साधनांनी घरच्या घरी पूजा कशी करावी, हे प्रात्यक्षिकासह शिकविले जाईल. *दोन तासांचा हा वर्ग हिंदू समाजातील सर्व जाती-समुदायांसाठी विनामूल्य असेल.* प्रशिक्षण केंद्राच्या परिसरातील कुटुंबांना त्यांच्या सर्व सदस्यांसह सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नोव्हेंबरअखेर प्रसिद्धी; त्यानंतर विभागीय नियोजन

नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत वृत्तपत्रे, समाजमाध्यमे आणि मंदिरांच्या सूचना फलकांद्वारे अभियानाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली जाईल. प्रशिक्षण, स्थानिक व्यवस्था, महिला सहभाग, संस्थांशी संपर्क, प्रसिद्धी, केंद्र संचालन आणि अहवाल यांसाठी कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित केल्या जातील.

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत विभागीय बैठका प्रस्तावित आहेत. या बैठकींमध्ये जिल्हा, तालुका, प्रखंड आणि नगरनिहाय केंद्रे, प्रशिक्षक आणि सहकार्य करणाऱ्या संस्थांची यादी तयार केली जाईल. प्रत्येक जिल्ह्याने किती कुटुंबांपर्यंत पोहोचायचे, हे ठरवून प्रखंडनिहाय वर्गांचे नियोजन करावे, अशी सूचना आहे. बैठकीत सहभागी कार्यकर्त्यांनाही पूजाविधीचे प्राथमिक प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.

मंदिर विश्वस्त आणि स्थानिक संस्थांच्या सहभागाला प्राधान्य

डिसेंबरमध्ये मंदिर विश्वस्त, अर्चक-पुरोहित, धर्माचार्य, मठांचे प्रतिनिधी, वेदपाठशाळा, स्वाध्याय व सत्संग मंडळे, भजन-कीर्तन मंडळे, महिला मंडळे, गणेशोत्सव व दुर्गोत्सव मंडळे तसेच धार्मिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी संस्थांच्या जिल्हानिहाय बैठका घेण्याचे नियोजन आहे. बैठकीत पूजेचे प्रात्यक्षिक दाखविले जाईल. प्रत्येक संस्थेने आपल्या परिसरात किती वर्ग, कुठे आणि केव्हा घेता येतील, हे ठरवावे, असे आवाहन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार जिल्हा किंवा नगर स्तरावर विशेष प्रशिक्षण समित्या स्थापन केल्या जातील.

प्रशिक्षकांसाठी विशेष वर्ग; प्रत्येक वर्गात किमान ५० जणांचे लक्ष्य



महाराष्ट्र–गोव्याच्या आराखड्यानुसार डिसेंबरमध्ये जिल्हा केंद्रे, मोठी तालुका केंद्रे आणि नगरांमध्ये प्रशिक्षकांसाठी विशेष वर्ग प्रस्तावित आहेत. प्रत्येक वर्गात महिला व पुरुष मिळून किमान ५० जण सहभागी व्हावेत, असे उद्दिष्ट आहे.

शिक्षक, प्राध्यापक, निवृत्त कर्मचारी, मराठी, हिंदी किंवा संस्कृत विषयाचे अभ्यासक, गृहिणी आणि इच्छुक युवक-युवती यांना प्रशिक्षक म्हणून सहभागी होता येईल. शिकण्याची तयारी, संवादकौशल्य आणि इतरांना प्रशिक्षण देण्यासाठी वेळ देण्याची इच्छा हे निवडीचे प्रमुख निकष असतील. अनुभवी पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली पूजाविधी, मंत्रोच्चार आणि प्रात्यक्षिकांचे प्रशिक्षण दिले जाईल. सोपी पूजाविधी पुस्तिका, मंत्रोच्चार मार्गदर्शिका आणि प्रात्यक्षिक व्हिडिओ तयार करण्याचेही नियोजन आहे.

मंदिरांसह समाजभवने, निवासी संकुले आणि शाळांमध्ये वर्ग

स्थानिक मंदिर केंद्रस्थानी ठेवून त्याच्या परिसरातील कुटुंबांना प्रशिक्षणासाठी बोलवावे, अशी केंद्रीय सूचना आहे. आवश्यकतेनुसार समाजभवन, निवासी संकुलातील योग्य जागा किंवा शाळा येथेही वर्ग घेता येतील. शाळा आणि शिकवणी वर्गांमधील विद्यार्थ्यांनाही पूजाविधीचे प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव आहे.

गाव, मोहल्ला, वस्ती किंवा निवासी संकुलातील सर्व इच्छुक कुटुंबांपर्यंत प्रशिक्षण पोहोचेपर्यंत दर आठवड्याला दोन तासांचा वर्ग घेण्यावर भर राहील. प्रत्येक आठवड्यात नव्या कुटुंबांना संधी दिली जाईल. त्या आठवड्यात किती कुटुंबांनी प्रशिक्षण घेतले, याची संख्या जिल्हा स्तरावर पाठविण्याची सूचना आहे.

३० डिसेंबरपर्यंत केंद्रांची निवड; प्रत्येक मंदिरात किमान एक वर्ग

महाराष्ट्र–गोव्यात ३० डिसेंबर २०२६ पर्यंत नियमित प्रशिक्षण केंद्रे आणि त्यांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करण्याचे उद्दिष्ट आहे. स्थानिक क्षमतेनुसार साप्ताहिक, पाक्षिक किंवा मासिक केंद्रे चालविली जातील. प्रमुख साप्ताहिक केंद्रात वर्षभरात किमान ४०, पाक्षिक केंद्रात सुमारे २४ आणि मासिक केंद्रात १२ वर्ग घेण्याचे नियोजन आहे. *प्रत्येक मंदिराने वर्षातून किमान एक पंचोपचार पूजा प्रशिक्षण वर्ग आयोजित करावा*, असे परिषदेने आवाहन केले आहे.

केंद्रप्रमुखांच्या मासिक बैठकीत वर्गांची संख्या, उपस्थिती, प्रशिक्षकांची उपलब्धता आणि स्थानिक अडचणींचा आढावा घेतला जाईल. किती कुटुंबांपर्यंत प्रशिक्षण पोहोचले, किती जण स्वतः पूजा करण्यास सक्षम झाले आणि किती ठिकाणी नियमित वर्गांची व्यवस्था उभी राहिली, या आधारे अभियानाचे मूल्यमापन केले जाईल.

प्रशिक्षित कुटुंबांची जिल्हानिहाय संमेलने प्रस्तावित

श्रीकृष्ण जन्माष्टमी व परिषदेच्या स्थापना दिनापासून विजयादशमीपर्यंत, म्हणजे *२५ ऑगस्ट ते ९ ऑक्टोबर २०२७* या कालावधीत, प्रशिक्षण घेतलेल्या कुटुंबांची जिल्हानिहाय *"नित्य पूजाविधी परिवार संमेलने"* आयोजित करण्याचा प्रस्ताव केंद्रीय सूचनापत्रात मांडण्यात आला आहे.

मंदिरे, संस्था आणि नागरिकांना आवाहन

मंदिर विश्वस्तांनी प्रशिक्षणासाठी स्थळ व वेळ उपलब्ध करून द्यावा, अर्चक-पुरोहितांनी पूजाविधीचे मार्गदर्शन करावे आणि स्थानिक संस्था व मंडळांनी वर्गांच्या आयोजनात सहभागी व्हावे. पंचोपचार पूजा शिकू इच्छिणाऱ्या कुटुंबांनी तसेच प्रशिक्षक म्हणून काम करण्यास इच्छुक महिला व पुरुषांनी आपल्या परिसरातील मंदिर विश्वस्त किंवा अभियानाच्या स्थानिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन *विश्व हिंदू परिषद, मंदिर, अर्चक-पुरोहित संपर्क आयाम, महा

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सेवा संकल्प अभियानांतर्गत महिलांना शिलाई मशीन सायकलीचे वाटप



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**महिलांना स्वामी बनवून त्यांचा आर्थिक सक्षम करणारा चालना देण्याच्या उद्देशाने सेवा संकल्प अभियान अंतर्गत पूर्णा तालुक्यातील गरजू महिलांना 150 शिलाई मशीन आणि 150 सायकलीचे वाटप करण्यात आले पूर्णा शहरातील गजानन मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या हस्ते लाभार्थी महिला विद्यार्थिनी यांना या साहित्याचे वितरण करण्यात आले

गेल्या महिन्यात परभणी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात सेवा संकल्प अभियानांतर्गत गरजू महिलांना शिलाई मशीन व विद्यार्थिनींना सायकलीच देण्याचा उपक्रम राबविण्यात आला होता त्याचाच उपक्रमाचा पुढील टप्पा म्हणून पूर्णा तालुक्यातील महिलांना विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी जि प सदस्य माणिक हजारे होते यावेळी जिल्हाप्रमुख विशाल कदम प्रकाश कराळे आणि विजय चव्हाण यांनी आपोआपले मनोगत व्यक्त केली या कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख दशरथ भोसले तालुकाप्रमुख व्यंकटराव पोळ पंचायत समिती सभापती उपसभापती काशिनाथ काळबांडे जि प सदस्य रितेश काळे शामराव कदम मुंजाजी कदम बालाजी कदम गणेश कदम अंकित कदम राम भालेराव अनंता घाटोळ सोमनाथ सोलव यांच्या सह तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते महिला विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुरुदेव गणेशलालजींच्या 147 व्या जन्मजयंती निमित्त तीन दिवस धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : कर्नाटक गजकेसरी पूज्य गुरुदेव श्री गणेशलालजी म. सा. यांच्या १४७ व्या जन्मजयंतीनिमित्त तसेच महाराष्ट्र प्रवर्तिनी ज्ञानगंगोत्री गुरुवर्या पूज्य प्रभाकंवरजी म. सा. यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त कुंभारवाडा येथील महावीर भवनात १४ ते १६ नोव्हेंबरदरम्यान विविध धार्मिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात व्याख्यान, गुरुभक्ती, तपश्चर्या, महामंत्र आराधना आणि बहिण-बेटी संमेलन असे विविध उपक्रम होणार आहेत.

१४ नोव्हेंबरला सायंकाळी ७ ते ९ या वेळेत उत्कर्ष समितीच्या वतीने 'एक शाम भारत के नाम' या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. अश्विनीजी उपाध्याय हे 'सुरक्षित भारत' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला साध्वी चैतन्यश्रीजी म. सा. आदी ठाणा-४ यांचे सान्निध्य लाभणार आहे.

१५ नोव्हेंबरला सकाळी ८.३० वाजता गुरुदेवांची जन्मजयंती साजरी होणार आहे. यावेळी सामूहिक तेला तप, नवकार महामंत्र आराधना, गुरु गणेश जाप, स्वाध्याय आणि गुरु गुणगान होईल. साध्वी चैतन्यश्रीजी, जिनाश्रीजी, सुबोधश्रीजी व निर्मितिप्रभाजी यांचे सान्निध्य लाभणार आहे. १६ नोव्हेंबरला भव्य बहिण-बेटी संमेलन होणार असून, कौटुंबिक नाती, स्नेह आणि एकोप्याचा संदेश दिला जाणार आहे. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांना सकल जैन समाजातील श्रावक-श्राविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सीताफळाची बी फुफ्फुसात अडकली; घाटीत अडीच वर्षांच्या चिमुकल्याला जीवदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सर्वत्र दिवाळीचा उत्साह सुरू असताना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे डॉक्टरांनी अडीच वर्षांच्या चिमुकल्याला नवजीवन दिले. सीताफळ खाताना त्याची बी अनावधानाने फुफ्फुसात अडकल्याने बालकाला श्वास घेण्यास त्रास होत होता. नातेवाइकांनी त्याला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले. येथे डॉक्टरांनी ब्रोन्कोस्कोपीच्या माध्यमातून फुफ्फुसात अडकलेली बी यशस्वीरीत्या बाहेर काढली.

घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कान, नाक व घसा विभागाचे प्रमुख डॉ. सुनील देशमुख आणि त्यांच्या पथकाने ही यशस्वी उपचारप्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेसाठी बालरोग विभागाच्या पथकप्रमुख डॉ. तृप्ती जोशी, बधिरीकरणशास्त्र विभागाचे डॉ. किरण आणि डॉ. गणेश निकम, ईएनटी विभागातील डॉ. गणेश मोहन, डॉ. ओमप्रकाश, डॉ. ऋतुजा, डॉ. वत्सल, डॉ. धनश्री यांच्यासह इतर निवासी डॉक्टरांनी परिश्रम घेतले.

या उपचारप्रक्रियेत ओटी-१ मधील कर्मचारी आणि कर्मचारी योगेश लाहोट यांचेही सहकार्य लाभले. संपूर्ण वैद्यकीय पथकाच्या समन्वयाने चिमुकल्याच्या फुफ्फुसात अडकलेली बी बाहेर काढण्यात यश आले. त्यामुळे दिवाळीच्या आनंदाच्या काळात एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.

डिग्रस येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई मिटली; निकिता काळे यांच्या पुढाकाराने टँकर सुरु



अजिंठा प्रतिनिधी : शिवाना सर्कलमधील डिग्रस गावात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई अखेर दूर झाली आहे. जिल्हा परिषद सदस्य राजुबाबा काळे यांच्या विशेष पुढाकारातून गावात पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला असून, आज श्रीफळ फोडून या सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

गेल्या काही दिवसांपासून डिग्रस परिसरात पाण्याची पातळी खालावल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत होती. नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन राजुबाबा काळे यांनी तात्काळ दखल घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला आणि गावासाठी टँकर मंजूर करून घेतला.

या टँकरद्वारे संबंधित सार्वजनिक विहिरीत दररोज पाणी टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, जेणेकरून सर्व ग्रामस्थांना सुरळीत आणि मुबलक पाणी उपलब्ध होऊ शकेल. टँकरच्या उद्घाटनाप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्न मार्गी लागल्याने डिग्रस ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत राजुबाबा काळे यांचे आभार मानले आहेत.


दुष्काळात परभणीच्या रब्बी हंगामासाठी कालव्यांद्वारे पाणी वितरण सुरु

परभणीत जिल्ह्यात पोहोचले जायकवाडीच्या पाण्याचे आवर्तन; राज्य शासनाच्या दुष्काळी भागासाठी उपाययोजना

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: यंदा अल निनोच्या प्रभावामुळे मराठवाड्यात पाऊस कमी पडला. त्यामुळे येथे उन्हाळ्यात संभाव्य चारा आणि पाणीटंचाई लक्षात घेता राज्य शासनाने रब्बी हंगामातील पशुचारा आणि पिण्याच्या पाण्याची उपाययोजना करण्यासाठी जायकवाडी धरणातून रब्बी हंगामाकरिता कालव्यांद्वारे पाणी वितरण सुरू केले आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील शेतीला डाव्या कालव्याद्वारे पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे.

नाथसागर जलाशयातून सोडण्यात आलेल्या पाण्याचे उजवा व डाव्या कालव्याच्या माध्यमातून नियोजित वितरण होत आहे. या पाण्याच्या आवर्तनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना यामुळे आधार मिळाला आहे. डाव्या कालव्याद्वारे सोडण्यात आलेला विसर्ग परभणी जिल्ह्यात पोहचला असून, जिल्ह्यातील रब्बी हंगामाला सिंचनाचे बळ मिळाले असल्याने शेतकरी रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याकामी



गुंतला आहे. अल निनोमुळे उद्भवलेल्या संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी प्रथम प्राधान्याने अन्नधान्य व चारा पिकांची लागवड करून घ्यावे. जायकवाडी प्रकल्पांतर्गत सर्व लाभधारकांनी पाणी वापराबाबत आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन नुकतेच जलसंपदा विभागाने केले आहे.

जायकवाडी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठ्यानुसार रब्बी हंगामात तीन पाणीपाळ्या देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, इतर अन्नधान्य तसेच चारा पिकांसाठी 15 ऑक्टोबर 2026 ते 28 फेब्रुवारी 2027 या कालावधीत कालव्याद्वारे तसेच मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी जलसंपदा विभागाने नुकतेच शेतक-यांकडून पाण्याची मागणी करणारे अर्ज मागवले आहेत.

यंदाच्या हंगामात पावसाचे असमान वितरण आणि काही भागांतील पाणीटंचाई यामुळे शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेऊन राज्य शासनाकडून उपलब्ध जलसाठ्याचा काटेकोर वापर करून शेती व पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. जायकवाडीच्या कालव्यांमधून सुरू झालेले पाणी वितरण रब्बी पिकांच्या वाढीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

जायकवाडी धरणाचा पाणीपुरवठा हा शेतीबरोबरच अनेक शहरांच्या आणि गावांच्या पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा वापर नियोजनबद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याची गरज सुरक्षित ठेवत सिंचनासाठीही पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवर्तनांचे नियोजन करण्यात आले आहे.

जायकवाडीच्या कालव्यांमधून सुरू झालेल्या पाणी वितरणामुळे रब्बी हंगामातील पिकांना आवश्यक ओलावा मिळण्यास मदत होणार असून, उपलब्ध जलसाठ्याच्या योग्य व्यवस्थापनातून शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा संतुलित ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मेघना साकोरे – बोर्डीकर आणि सह पो.आ.दिपक साकोरे यांची बालगृहात दिवाळी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर आणि त्यांचे पती नवी मुंबई शहर पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे यांनी पनवेल येथील खांदा कॉलनीत 'पंचदीप बालग्राम संकुल' येथे सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी बालगृहातील मुलांसमवेत वेळ घालवत त्यांच्याशी आपुलकीच्या वातावरणात मनमोकळा संवाद साधला.

या वेळी राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी मुलांच्या शिक्षणाची, आरोग्याची तसेच त्यांना



पुरवण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांची अत्यंत आस्थापूर्वक चौकशी केली. मुलांनीही राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांच्याशी संवाद साधत आपल्या दिनचर्येची व अभ्यासाची माहिती दिली. राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सर्व मुलांना उत्तम शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी होण्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

कुमारी वैजयंती कदम हिचा विशेष सत्कार

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे पूर्वी बालगृहात राहिलेली विद्यार्थिनी वैजयंती कदमने कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांच्या हस्ते तिचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीकांत हावळे, सहाय्यक पोलीस आयुक्त भुजबळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ढाकणे, पंचदीप बालग्रामच्या कार्याध्यक्ष मीनल टिपणीस, 'वन स्टॉप सेंटर'च्या सरिता वाडेकर तसेच '१०९८ चाइल्ड हेल्पलाइन'च्या नीलाक्षी दगडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी व बालगृहातील मुले उपस्थित होती.

जागतिक मधुमेह दिनानिमित्त जनजागृतीवर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मधुमेहाचे वेळीच निदान करून नियमित उपचार घेणे आणि जीवनशैलीत आवश्यक बदल करणे, यामुळे या आजारामुळे उद्भवणाऱ्या गंभीर गुंतागुंती टाळता येऊ शकतात. यासाठी नागरिकांमध्ये मधुमेहाबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी जागतिक मधुमेह दिन साजरा केला जातो. यंदा 'लवकर कृती करा, मधुमेहाच्या गुंतागुंती टाळा' या संदेशातून आजाराची जोखीम ओळखणे, वेळेवर तपासणी करणे आणि उपचार सुरू करण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. मधुमेह हा दीर्घकालीन असंसर्गजन्य आजार असून त्याचे वेळीच निदान आणि योग्य व्यवस्थापन न झाल्यास हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, डोळ्यांचे आजार तसेच मज्जासंस्थेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. वारंवार लघवी होणे, जास्त तहान व भूक लागणे, विनाकारण वजन कमी होणे, थकवा, अशक्तपणा, अंधुक दिसणे आणि जखमा लवकर बऱ्या न होणे ही मधुमेहाची प्रमुख लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी जवळच्या आरोग्य संस्थेत जाऊन रक्तशर्करेची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रेल्वेतगर्दीचा फायदा घेत प्रवासाच्या सामानावर चोरट्यांनी मारला डल्ला

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी**सणासुदीच्या वेळेस गर्दीचा फायदा घेऊन अनेक प्रवाशाचे सामान चोरटे लंपास करत असतात. असाच एक प्रकार परभणी रेल्वे स्टेशन येथे अजंठा एक्सप्रेस मे प्रवास करत असणाऱ्या एका महिला प्रवाशाचा डोळा लागल्याने चोरट्याने महिला प्रवाशा जवळील मोबाईल फोन व इतर साहित्य मिळून 45 320 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला ही घटना 12 नोव्हेंबर रोजी मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास घडली अजिंठा एक्सप्रेस परभणी रेल्वे स्थानकावरून अजिंठा एक्सप्रेस गाडी सुटल्यानंतर प्रवाशाला चोरी झाल्याचे लक्षात आले याप्रकरणी लोहमार्ग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक माहिती अशी की गौरी पेडगावकर यांनी तक्रार दिली आहे फिर्यादी या अजिंठा एक्सप्रेस ने प्रवास करत होत्या प्रवासात त्यांना झोप लागली व याचाच फायदा घेत गर्दीमध्ये चोरट्याने त्यांच्या जवळील एक बॅगलंपास केली सदर बॅगेत मोबाईल रोख रक्कम व इतर साहित्य मिळून चोरट्याने एकूण 45 हजार 320 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला परभणी रेल्वे स्थानकावरून गाडी सुटल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात आले अज्ञात चोरट्याच्या विरोधात लोहमार्ग पोलिसात तक्रार देण्यात आली असून पोलीस लोहमार्ग पोलीस अधिक तपास करत आहेत दरम्यान सध्याच्या काळातदिवाळीच्या सुट्ट्या असल्याने रेल्वे मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली आहे या गर्दीचा फायदा घेत चोरटे परवाच्या जवळील मौल्यवान साहित्य मोबाईल लंपासकरत आहेत या चोरट्याचा बंदोबस्त करावा असा सर्व सामान्यप्रवाशाकडून रेल्वे प्रशासनाकडे मागणी केली जात आहे.

सोयगाव तालुक्यातील घोसला येथे माजी सरपंच सुवर्णा वाघ यांच्या हस्ते भालेराव परिवारास वस्त्रदान; दिवाळीचा आनंद द्विगुणित

सोयगाव दि.१३ नोंव्हेंबर

दानातून केवळ गरजूंची मदत होत नाही, तर समाजात आपुलकी, कृतज्ञता आणि माणुसकीचे नाते अधिक घट्ट होते,या उदात्त भावनेतून घोसला येथील माजी सरपंच सुवर्णा ज्ञानेश्वर वाघ व वाघ परिवाराच्या वतीने दिवाळी व भाऊबीजेनिमित्त गावाची पिढ्यान्पिढ्या निःस्वार्थ सेवा करणाऱ्या भाऊसाहेब रतन भालेराव आणि त्यांच्या परिवाराला वस्त्रदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

घोसला गावाच्या सेवेत भालेराव परिवाराचे मोठे योगदान आहे. त्यांच्या या सेवेची दखल घेत सणासुदीच्या



काळात त्यांचा आनंद द्विगुणित व्हावा, या हेतूने माजी सरपंच सुवर्णा ज्ञानेश्वर वाघ आणि ज्ञानेश्वर वाघ यांनी भालेराव परिवाराची भेट घेऊन त्यांना नवीन वस्त्रे व भेटवस्तू देऊन सन्मानित केले. वाघ परिवाराच्या या संवेदनशील आणि मदतीच्या भावनेने भालेराव परिवार भारावून गेला.

याप्रसंगी भावना व्यक्त करताना भाऊसाहेब रतन भालेराव म्हणाले की, "आमची पिढ्यान्पिढ्या चालत आलेली गावसेवेची परंपरा आम्ही यापुढेही अशीच कायम राखू. आमच्या घोसला मातृभूमीचे कर्तव्य बजावण्यात आम्ही कधीही कसूर होऊ देणार नाही."

या स्तुत्य उपक्रमाबद्दल भाऊसाहेब रतन भालेराव व त्यांच्या संपूर्ण परिवाराने माजी सरपंच सुवर्णा वाघ व समस्त वाघ परिवाराचे मनःपूर्वक आभार मानून ऋण व्यक्त केले. तसेच, हा प्रेम आणि सलोख्याचा जिव्हाळ्याचा संबंध असाच अविरत टिकून राहो, अशी सदिच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आली. वाघ परिवाराच्या या उपक्रमाचे गावपातळीवर सर्वत्र कौतुक होत आहे.

दिवाळीच्या संध्येला आदिवासी काळदरी वस्तीवर पेटला आशेचा दिवा ; युवा प्रतिष्ठानने साधला नागरिकांशी संवाद



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१३ नोंव्हेबर

ऐन दिवाळी च्या पूर्वसंध्येला तालुक्यातील आदिवासी काळदरी गावात युवा प्रतिष्ठान जरंडी यांनी आदिवासी वस्ती वर जाऊन येथील ५५ आदिवासी ग्रामस्थांना आनंदाचा शिधा वाटप केला युवा प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश देण्यात आला

दिवाळी म्हणजे आनंद,उत्साह आणि प्रकाशाचा सण मात्र, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असलेल्या वंचित घटकांच्या जीवनात हा आनंद पोहोचविण्याचे काम युवा प्रतिष्ठानने संवेदनशीलतेने केले, तर खऱ्या अर्थाने दिवाळीचा प्रकाश सर्वदूर पोहोचू शकतो. असाच माणुसकीचा आणि संवेदनशीलतेचा प्रत्यय तालुक्यातील तालुक्यातील काळदरी येथील आदिवासी वस्तीवर आला. दिवाळीच्या मंगल पर्वाच्या पार्श्वभूमीवर युवा प्रतिष्ठानच्या सदस्यांनी आदिवासी काळदरी गावात वस्तीवर जाऊन नागरिकांची भेट घेतली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यासोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची ग्वाही दिली. यावेळी या आदिवासी ग्रामस्थांना युवा प्रतिष्ठानने दिवाळी किटचे वाटप केले.उपजीविकेची साधने, हक्काची जागा, पिण्याच्या पाण्यासह रहिवाशांनी मांडल्या. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत कायमस्वरूपी रोजगाराचे समस्या मांडली. उपजीविकेची साधन याकडेही रहिवाशांनी लक्ष वेधले. प्रत्येक समस्येची युवा प्रतिष्ठानने गांभीर्याने दखल घेतली. हक्काच्या हक्काच्या निवासस्थानाचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित यंत्रणेमार्फत योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन युवा प्रतिष्ठानच्या वतीने दिले.


या भेटीतील विशेष लक्षवेधी क्षण म्हणजे युवा प्रतिष्ठान ने वस्तीवरील लहान मुलांशी साधलेला मनमोकळा संवाद. मुलांच्या शिक्षणाबाबत त्यांनी आस्थेने विचारपूस केली. प्रत्येक मुलाने नियमित शाळेत जाऊन शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणामुळेच जीवनात प्रगतीची संधी निर्माण होते, असे सांगत त्यांनी पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन प्रतिष्ठानने केले.

आदिवासी काळदरी भेटीला माणुसकीची जोड देत युवा प्रतिष्ठान ने वस्तीवरील नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. यावेळी स्वप्नील महाजन, वैभव लव्हाळे,सचिन चौधरी, राहुल पाटील,सुनील मनगटे,मयूर पाटील,वैभव पाटील,अरुण हिवाळे,शिवाजी चौधरी, प्रशांत घनघाव,रवींद्र आप्पा पाटील,चेतन पाटील,काशिनाथ गांगड, अनिल गांगड,आदींसह युवा प्रतिष्ठान चे सदस्य उपस्थित होते.

आजचे मराठी शब्दकोडे

काळ्या-पांढऱ्या चौकटींचा नमुना

पांढऱ्या चौकटीत अक्षरे भरा ▯ काळ्या चौकटी रिकाम्या ठेवा



आडवे प्रश्न

१. भारताची राजधानी
२. महाराष्ट्राची राजधानी
३. जंगलाचा राजा
४. राष्ट्रीय पक्षी
५. पाण्याचा समानार्थी शब्द
६. फुलांचा राजा

उभे प्रश्न

१. रात्री आकाशात दिसतो
२. दूध देणारा प्राणी
३. आठवड्यातील एक वार
४. सूर्याचा समानार्थी शब्द
५. फळांचा राजा
६. पुस्तक वाचण्याची जागा

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांसाठी खासदार रामराव वडकुते यांची दक्षिण मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांसोबत महत्त्वपूर्ण बैठक!

हिंगोली–नांदेड रेल्वे दुहेरीकरणासह विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा; रेल्वे सुविधांच्या विस्तारासाठी खासदारांचा पुढाकार

हिंगोली | मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांच्या समस्या, रेल्वे सुविधांचा विस्तार आणि प्रलंबित विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी सिकंदराबाद येथे दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत मराठवाड्यातील विविध रेल्वे प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात आल्या.



या बैठकीत हिंगोली–नांदेड रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचा प्रश्न प्राधान्याने उपस्थित करण्यात आला. या कामाबाबत लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते यांनी व्यक्त केली.

तसेच LTT–नांदेड एक्स्प्रेसच्या वेळेत बदल करणे, पुणे–नांदेड रेल्वे गाडीच्या वेळापत्रकात प्रवाशांच्या सोयीचा विचार करणे, अकोला–पूर्णा पॅसेंजर गाडीचा विस्तार नांदेडपर्यंत करणे, अशा महत्त्वपूर्ण मागण्यांवर चर्चा करण्यात आली व इंटरसिटी एक्स्प्रेसला बोल्डा रेल्वे स्थानकावर थांबा देण्याबाबत संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांकडे मागणी करण्यात आली. पूर्णा आणि हिंगोली येथील रेल्वेच्या मोकळ्या जागांचा सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) तत्त्वावर विकास करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

मराठवाड्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करणे, प्रवाशांचा प्रवास सुखकर व सोयीस्कर करणे आणि रेल्वेच्या माध्यमातून या भागाच्या विकासाला चालना देणे, यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचे खासदार रामराव वडकुते यांनी सांगितले.

या बैठकीस संघर्ष समितीचे गोवर्धन विरकुवर, अण्णा शेख, खलील बेलदार, प्रफुल जैन, प्रकाश नाईक, पांढरीनाथ ढाले, संजय कावडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

अजिंठा घाटात दोन ट्रकाचा अपघात घाटात ट्राफीक जाम

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर- जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात दर्ग्यासमोर दोन ट्रकचा अपघात झाल्याने वाहतूक कोंडी झाली. गुरुवारी रात्री साडे दहा वाजता एक ट्रक (एमएच २३, ५२९७) जळगाव हुन बीड कडे किरणा माल घेऊन जात असताना समोरून छत्रपती संभाजीनगर हुन राजस्थान जाणारा ट्रक (आरजे ०९ जीबी ८९८७) हा ट्रक रिकामा होता. त्याचा ब्रेक जाम झाल्याने समोरील ट्रकला तो धडकला. किराणामालाचा ट्रक रस्त्यावर पलटी झाला. यामुळे घाटात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. चालक आतिश चंद्रभान राठोड (वय २६, रा. बीड), दुसरा चालक प्रलयनाथ थाकन (वय५५, राजस्थान) हे दोन्ही चालक किरकोळ जखमी झाले. त्यांना अजिंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी घाटात अजिंठा पोलीसांनी वाहतूक सुरळीत केली. लहान चारचाकी गाड्यांनी पुढे जाण्याच्या धडपडीत एका बाजूने सर्व रस्ता अडवल्याने वारंवार वाहतूक कोंडीचा त्रास होत होता. शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता क्रेनच्या सहाय्याने घाटातली अपघातग्रस्त ट्रक काढण्यात आला. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. यावेळी अजिंठा पोलीस स्टेशनचे कर्मचारी संतोष पाईकराव, दिपक पाटील, दिलिप तडवी, होमगार्ड भरत घन, सागर इंगळे यांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यात आली

परभणीत ग्रामीण युवकांना ड्रोनचे दहा दिवसीय प्रशिक्षण

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लक्षित गटासाठी 10 दिवसीय निवासी विनामूल्य ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणास 24 नोव्हेंबरपासून परभणी येथे प्रारंभ होणार आहे.

ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर सध्या विविध क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. शेतीमध्ये कीटकनाशकांची फवारणी, पीक सर्वेक्षण, भूमापन, व्हिडिओग्राफी, फोटोग्राफी तसेच विविध शासकीय प्रकल्पांचे निरीक्षण अशा अनेक कामांसाठी ड्रोनचा प्रभावी वापर केला जात आहे. या वाढत्या वापरामुळे प्रशिक्षित ड्रोन पायलटची मागणी आणि रोजगाराच्या संधीही निर्माण होत आहेत.

ही बदलती गरज लक्षात घेऊन अमृत संस्थेने ड्रोन मिशन हाती घेतले आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवकांना, विशेषतः ग्रामीण भागातील युवकांना, आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचे कौशल्य आत्मसात करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या निवासी प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था अमृत संस्थेमार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित राहणाऱ्या पात्र युवकांनाही या संधीचा लाभ घेता येणार आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर स्वतःचा ड्रोन खरेदी करून व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना अमृत संस्थेच्या कर्ज व्याज परतावा योजनेचाही लाभ घेता येऊ शकतो. त्यामुळे प्रशिक्षणासोबतच भविष्यात उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुक युवकांनी अमृत जिल्हा कार्यालय परभणी येथे संपर्क साधावा, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक अनिरुद्ध खंबायते आणि सुरेश बनकर उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त राज्यभर जनजातीय गौरव सप्ताह

आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि शासकीय योजनांचा होणार जागर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राज्यभर ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान 'जनजातीय गौरव दिन सप्ताह' साजरा करण्यात येत असून, या सप्ताहात आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान जनतेपर्यंत पोहोचविण्यासह विविध कल्याणकारी योजनांचा जागर करण्यात येणार आहे. या उपक्रमांची माहिती देण्यासाठी भाजपच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री अतुल सावे, आमदार प्रशांत बंब, आमदार सुहास शिरसाठ, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, जिल्हाध्यक्ष संजय समाजाला संघटित करून संघर्ष उभारला होता. त्यांचे शौर्य, त्याग आणि आदिवासी अस्मितेसाठीचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे.

सप्ताहांतर्गत १४ नोव्हेंबर रोजी आदिवासी स्वातंत्र्यसेनानींच्या स्मारकांची आणि पुतळ्यांची स्वच्छता करून सायंकाळी दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाणार आहे. आदिवासीबहुल भागांत शोभायात्रा, जनजातीय स्वाभिमान संमेलने, सांस्कृतिक मेळावे, लोकनृत्य, लोकगीतांचे कार्यक्रम आणि विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याची आणि विचारांची ओळख निर्माण करण्यासाठी चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. तसेच जिल्हास्तरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुरस्कारप्राप्त व्यक्ती, आदिवासी उद्योजक, साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी आणि संत-महंत यांना 'भगवान बिरसा मुंडा पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे.

आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि आर्थिक विकासासाठी तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर सप्ताहात विशेष भर दिला जाणार आहे. वनसंपदेच्या मूल्यवर्धनाबाबतही जनजागृती करण्यात येणार आहे. याशिवाय सोशल मीडियाच्या माध्यमातून लेख, पॉडकास्ट आणि रील्सद्वारे भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा प्रसार केला जाणार आहे.

शेकापचे उरण तालुका चिटणीस रवी घरत यांच्या हस्ते रायगड तोफच्या " देवमाणूस" या अंकाचे प्रकाशन उत्साहात संपन्न

उरण दि १३(विठ्ठल ममताबादे)संघर्षाच्या जात्यावर स्वतःच्या आयुष्याचे पीठ करून कष्टकरी शेतकरी, श्रमजीवी जनतेला भाकरी देऊन स्वाभिमानाचे जीवन जगण्याचे सामर्थ्य देणारे लोकनेते दि.बा.पाटील यांच्या प्रति आदर व कृतज्ञता या भावनेतून, आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळ नामकरण करावे अशी मागणी येथील भूमीपुत्रांची व रायगड,ठाणे जिल्ह्यातील जनतेची आहे.तेव्हा केंद्र सरकारने लोकांच्या जनभावनेचा आदर करावा असे आवाहन शेकापचे उरण तालुका चिटणीस



रवी घरत यांनी रायगड तोफच्या " देवमाणूस" या अंकाच्या प्रकाशन समारंभात केले.

उरण येथील सामाजिक कार्यकर्ते यशवंत ठाकूर यांच्या कल्पक पुढाकाराने रायगड तोफच्या देवमाणूस या अंकाचे प्रकाशन शेकापचे उरण तालुका चिटणीस मा.रवी घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.यावेळी उरण तालुका शेकाप प्रणीत सेवा निवृत्त संघटनेचे अध्यक्ष मा.डी. आर . ठाकूर हे अध्यक्षस्थानी होते.तर सुहास घरत विद्यमान उपाध्यक्ष, यशवंत ठाकूर, कार्याध्यक्ष, काशिनाथ भोईर, सचिव, दत्ता घरत, सल्लागार, मनोहर पाटील, खजिनदार, प्रकाश पाटील, रमेश कोळी,भ. पो.म्हात्रे, स .ही.पाटील आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी रवी घरत पुढे म्हणाले की, ज्या भूमीत हे विमानतळ उभे आहे ती भूमी दि.बा.पाटील यांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे.येथील भूमीपुत्रांनी त्यांना पाचवेळा आमदार व दोनवेळा खासदार म्हणून निवडून दिले आहे.तसेच विमानतळ नामकरण बाबत महाराष्ट्र राज्य विधानसभा व विधानपरिषदेत एकमताने लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळ नामकरण करावे असा ठराव घेऊन तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे.

पाच महिन्यांतील 21 मोबाईलचा शोध; 3.40 लाखांचा मुद्देमाल नागरिकांच्या स्वाधीन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : मोबाईल चोरी आणि हरवण्याच्या घटनांमुळे नागरिकांना आर्थिक नुकसानासह वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याची भीती असते. अशा तक्रारींची गांभीर्याने दखल घेत वेदांतनगर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे मागील पाच महिन्यांत हरवलेले आणि चोरीस गेलेले २१ मोबाईल शोधून काढले आहेत. शहरासह जिल्ह्याबाहेर आणि परराज्यांतही या मोबाईलचा शोध घेण्यात आला. सुमारे ३ लाख ४० हजार रुपयांचे मोबाईल संबंधित नागरिकांना परत करण्यात आले.

मोबाईल हरवल्यानंतर किंवा चोरीला गेल्यानंतर त्याचा शोध घेणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान असते. मात्र, वेदांतनगर पोलिसांनी सीईआयआर (CEIR) पोर्टलचा वापर करून या प्रकरणांचा तांत्रिक माग काढला. मोबाईलची माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे



वेगवेगळ्या ठिकाणी वापरात असलेले मोबाईल शोधण्यात आले. छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध भागांसह महाराष्ट्रातील इतर जिल्हे आणि परराज्यांतून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले.

पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस उपआयुक्त पंकज अतुलकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

सारडे विकास मंच आयोजित किल्ले स्पर्धेला उदंड प्रतिसाद; 68 किल्ल्यांची नोंदणी

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गडकिल्ल्यांचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम









उरण दि. १३ : छत्रपती शिवाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास आणि गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व नव्या पिढीला समजावे, तसेच मुलांमध्ये इतिहासाविषयी आवड आणि जिज्ञासा निर्माण व्हावी, या उद्देशाने सारडे विकास मंचाच्या वतीने दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाही आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, तब्बल ६८ किल्ल्यांची नोंदणी करण्यात आली.

सह्याद्री प्रतिष्ठानचे प्रितेश कोळी, अभिषेक ठाकूर आणि अक्षय कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व किल्ल्यांचे परीक्षण व निरीक्षण करण्यात आले. स्पर्धेमध्ये मुलांनी आपल्या कल्पकतेचा, कलाकौशल्याचा आणि ऐतिहासिक जाणिवेचा सुंदर आविष्कार सादर केला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक किल्ले रायगड साकारल्याबद्दल राज महेश घरत याने पटकावला. द्वितीय क्रमांक मुरुड-जंजिरा किल्ल्यासाठी स्वाद घनश्याम पाटील याला मिळाला. तर उत्तेजनार्थ पारितोषिके अजिंक्यतारा किल्ल्यासाठी ईशान निलेश म्हात्रे आणि सिंधुदुर्ग किल्ल्यासाठी मोहित मिलन माळी यांना प्रदान करण्यात आली. विजेत्यांना बक्षिसे आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व ६८ स्पर्धकांना नानोशी, पनवेलचे सरपंच विनंती मोहन पाटील यांच्या वतीने भेटवस्तू देऊन प्रोत्साहनपर गौरविण्यात आले. त्यामुळे सहभागी बालस्पर्धकांचा उत्साह द्विगुणित झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसाद पाटील (माजी सरपंच, वशेणी), निवास गावंड (सुयश क्लासेस, आवरे), रविंद्र पाटील (माजी उपसरपंच, कळंबुसरे), ॲड. रनिता ठाकूर, आदर्श शिक्षक उपेंद्र ठाकूर, कॉमेडी कलाकार रोशन घरत, गजानन ठाकूर, कृषिमित्र प्रकाश माळी, हॉटेल एम.डी.एस.चे मालक नितीन म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, श्री गणेश फर्निचरचे मालक विनोद पाटील, गणेश पाटील, अमोल पाटील, सिद्धेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड. रनिता ठाकूर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन पाटील (खोपटे) यांनी प्रभावीपणे केले. याप्रसंगी निवास गावंड सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, "सारडे विकास मंच ही एक आदर्श संस्था असून, अशा संस्थेचा आपण एक भाग आहोत, याचा आम्हाला मनापासून अभिमान आहे," असे गौरवोद्गार काढले.

किल्ले स्पर्धेसाठीची बक्षिसे रविंद्र पाटील (माजी उपसरपंच, कळंबुसरे), प्रा. अनिल नायडू, प्रशांत म्हात्रे आणि विनायक म्हात्रे यांनी दिली. तर स्पर्धकांसाठी खाऊची व्यवस्था हरिश्चंद्र म्हात्रे, गणेश पाटील आणि नितीन म्हात्रे यांनी केली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लहानग्यांनीही मोलाचे योगदान दिले. किल्ल्यांची नावनोंदणी आणि फोटोग्राफीची जबाबदारी रिया म्हात्रे, नील म्हात्रे, अक्षता, निरव म्हात्रे, राजेश पाशी, सारा म्हात्रे आणि विभा म्हात्रे या बालचमूने उत्साहाने पार पाडली. तसेच प्रकाश माळी, विनोद पाटील, अमोल पाटील, सिद्धेश पाटील आणि हरिश्चंद्र म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेत स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

शेवटी सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी उपस्थित मान्यवर, स्पर्धक, पालक आणि आयोजनासाठी विशेष मेहनत घेणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

इतिहासाची ओळख, गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि बालकांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा सारडे विकास मंचाचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911